**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३१/२०१६-१७/२०३ दिनांक: २८-११-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. ३१/२०१६-२०१७**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. मेकासॉफ्ट तर्फे श्री तुषार सु.कुलकर्णी<br>प्लॉट क्र.९७ - ९९ ,११४ फेज-१ सेक्टर बी<br>लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट,)तिळवणी<br>ता. हातकणंगले, जिल्हा. कोल्हापूर | : | **तक्रार<br>अर्जदार<br>(ग्राहक** |
| | **विरुध्द** | | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी | | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग इचलकरंजी ग्रामिण | | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार मे. मेकासॉफ्ट तर्फे भागिदार श्री तुषार सुरेशराव कुलकर्णी यांनी प्रस्तुत गा-हाणे दाखल केले आहे. मे. मेकासॅाफ्ट यांचा उद्योग व्यवसाय प्लॉट क्र.९७ - ९९ , ११४ फेज-१ सेक्टर बी लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, तिळवणी ता. हातणकणगंले जि. कोल्हापूर येथे चालू असून त्यांचा वीज ग्राहक क्र. २५०४९०००८७०१ असा आहे. त्यांचा वीज पुरवठा मार्च-२०१५ पासून चालू आहे. वीज जोडणी घेताना त्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केली होती. तथापि वि.प. यांचेकडून तक्रारदार यांना दि. २३-०६-२०१६ रोजी नोटीस देणेत येऊन कळविण्यात आले की, तक्रारदार यांच्या उपरोक्त जागेमध्ये मे. एल. एस.पी. यार्न कंपनी.या नावे ग्राहक क्र. २५०४९०१९२२६० आणि २५०४९०१९२९०१ अशा ज्या दोन वीज जोडण्या होत्या त्या कायमपणे बंद होऊन एकूण रु. १,५१,९१०/- इतकी थकबाकी येणे आहे व ती तक्रारदार यांनी वि.प. कडे जमा करावी अन्यथा सदर थकबाकी तक्रारदार यांच्या देयकांमध्ये वर्ग करण्यात येईल असे ही कळविले. तक्रारदार यांच्या म्हणण्याप्रमाणे वि.प. यांची वरील मागणी चुकीची व बेकायदेशीर आहे. तक्रारदार यांचा मे. एल. एस.पी यार्न कं. यांचेशी कोणताही संबंध नाही. तसे त्यांनी वि.प. यांना पत्राने कळविले. त्यानंतर तक्रारदार यांनी दिनांक २९-०७-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दि.०५-१०-२०१६ रोजी आदेश केला तो मान्य झाला नसल्यामुळे तक्रारदार यांनी या मंचाकडे अपिल दाखल केले आहे.

२) वि.प. यांचेतर्फे लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, तक्रारदार यांना मार्च-२०१५ मध्ये तात्पुरती वीज जोडणी दिलेली आहे. एप्रिल, मे-२०१६ मध्ये कायम स्वरुपी बंद केलेल्या वीज जोडणीच्या ग्राहकांबाबत विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यावेळी असे आढळून आले की, तक्रारदार यांच्या भूंखंडावर ग्राहक क्र. २५०४९०१९२२६० व २५०४९०१९२९०१ अशा दोन वीज जोडण्या श्री एल. एस.पी. यार्न मनुर्फेक्चरींग कं. यांच्या नावे होत्या आणि त्या जोडण्या अनुक्रमे डिसेंबर २००४ व २००३ पूर्वी कायम स्वरुपी बंद केल्या होत्या आणि त्यांचे कडून अनुक्रमे रु. १,२६,२३०/- आणि रु. २५,६८०/- इतकी थकबाकी वि.प. यांना येणे होती. त्यामुळे तक्रारदार यांना वि.प. यांनी नोटीस दिली. वि.प. शेवटी असे नमूद करतात की, या मंचाने तक्रारदार यांना वरील सर्व थकबाकी भरण्याचा आदेश करावा.

३) या प्रकरणाची सुनावणी या मंचासमोर दि. २४-११-२०१६ रोजी घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार अगर त्यांचे प्रतिनिधी श्री विनोद कांबळे उपस्थित नव्हते. परंतु श्री विनोद कांबळे यांनी लेखी स्वरुपात युक्तिवाद दाखल केला आहे. वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री सागर मारुळकर व उपकार्यकारी अभियंता इचलकरंजी ग्रामिण श्री कैरमकोंडा एस.पी. हजर होते व त्यांनी तोंडी युक्तिवाद केला.

४) सर्व उपलब्ध कागदपात्रे व युक्तिवादाचा विचार करता या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ प्रमाणे पूर्वीचे ग्राहक श्री एल. एस.पी. द्वेद यार्न मनुफॅक्चरींग कंपनी यांच्या दोन वीज जोडण्यांची कथित थकबाकी प्रस्तुत तक्रारदार यांचेकडून वसूल करता येईल काय?

उत्तरः- नाही.

(२)कोणता  अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

५) भूखंड क्र. ९७ ,९८, ९९ व ११४ , फेज-१ सेक्टर- बी लक्ष्मी इंस्ट्रीयल इस्टेट , तिळवणी ता, हातकणंगले जि. कोल्हापूर या ठिकाणी तक्रारदार यांचा व्यवसाय चालू असून त्यांना दि.२४-०३-२०१५ रोजी तात्पुरती व्यापारी वीज जोडणी वि.प. यांनी दिली आहे व त्याचा ग्राहक क्र. २५०४९०००८७०१ असा आहे. तक्रारदार यांच्यासदर वीज पुरवठयाची कोणतीही थकबाकी वि. प. यांना येणे आहे असे वि. प. यांचे म्हणणे नाही. वरील भूखंडावर काही वर्षापूर्वी श्री एल. एस.पी. द्वेद यार्न मनुफॅक्चरिंग कंपनी यांच्या ग्राहक क्र. २५०४९०१९२२६० आणि २५०४९०१९२९०१ अशा दोन वीज जोडण्या चालू होत्या. त्या अनुक्रमे डिसेंबर २००४ आणि २००३ पूर्वी कायम स्वरुपी खंडीत करण्यात आल्या . सदर कंपनीकडून वरील वीज जोडण्याबाबत रु. १,२६,२३०/- आणि २५,६८०/- इतकी थकबाकी वि.प. यांना किंवा तत्कालीन म.रा.वि.मंडळ यांना येणे होती. सदर कंपनी वरील भूखंडा वरुन दूर गेल्यानंतर तेथे इतर कोण ग्राहक होते याची योग्य माहिती मिळत नाही.

६) प्रस्तुत तक्रारदार आणि उपरोक्त एल. एस.पी. यार्न कंपनी यांचा अर्था अर्थी काही संबंध होता अगर त्यांच्या संचालक/भागिदार यांच्यामध्ये काही संबंध होता असे दिसून येत नाही. वितरण कंपनीने सदर एल.एस.पी. कंपनी विरुध्द विद्युत कायदा कलम ५६ (१) प्रमाणे वीज पुरवठा कायमपणे बंद करण्या खेरीज,अन्य कायदेशीर कारवाई केली असल्याचे आढळून येत नाही.

७) एखाद्या पूर्वीच्या ग्राहकाची वीज थकबाकी, वितरण कंपनीच्या परिपत्रक क्र. ६०७ दि.१९-१२-१९९८ प्रमाणे नंतरच्या वीज ग्राहकाकडून वसूल करता येईल असे जरी मानले तरी विद्युत कायदा २००३ च्या कलम ५६ (२) प्रमाणे काही नियमाची पूर्तता झाली असणे गरजेचे आहे. पूर्वीच्या वीज ग्राहकाकडून येणे असणारी थकबाकी मुदतीमध्ये असणे जरुरीचे आहे. ती थकबाकी अव्याहतपणे (Continuously ) वसूलीस पात्र असल्याचे दर्शविण्यात आले असले पाहिजे. कलम ५६(२) प्रमाणे मागिल दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची अशी थकबाकी मुदतबाहय ठरते. कलम ५६(१) नुसार वितरण कंपनीस अशा थकबाकीदार ग्राहकास पंधरा दिवसांची रितसर नोटीस देऊन सक्षम न्यायालयात दावा दाखल करता येतोच, शिवाय वीज पुरवठा खंडीत सुध्दा करणेचा अधिकार आहे.

वरील परिपत्रका संदर्भात सांगायचे झाले तर हे नमूद करावे लागेल की, मा. नामदार मुंबई उच्च न्यायालयाने ते परिपत्रक रद्दबातल ठरविल्यानंतर त्याच्या वैधतेचा प्रश्न मा. नामदार सर्वोच्च न्यायालयात अद्यापही प्रलंबित आहे.

८) प्रस्तुत प्रकरणांत, वितरण कंपनीने उपरोक्त श्री एल. एस.पी. द्वेद यार्न मनुफॅक्चरिंग कंपनी, यांची वीज जोडणी कायम स्वरुपी बंद करण्या व्यतिरिक्त , कलम ५६ प्रमाणे अन्य काही कारवाई केली असल्याचे आढळून येत नाही.

९) वर नमूद केल्याप्रमाणे श्री एल. एस.पी. द्वेद यार्न कंपनी यांच्या उपरोक्त वीज जोडण्या डिसेंबर २००४ मध्ये किंवा त्यापूर्वी कायमपणे बंद केल्यानंतर जवळजवळ १२ वर्षानी वि.प. यांनी प्रस्तुत तक्रारदार विरुध्द सुरु केलेली , थकबाकी वर्ग करण्याची आणि ती वसूल करण्याची कारवाई योग्य व कायदेशीर ठरत नाही. वितरण कंपनी यांना कायद्याप्रमाणे अनुज्ञेय असल्यास, श्री एल. एस. पी. यार्न कंपनी विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई थकबाकी वसुलीसाठी करता येईल. परंतु त्यांची थकबाकी एकूण रु.१,५१,९१०/- प्रस्तुत तक्रारदारकडून अयोग्य प्रकारे वसूल करता येणार नाही. असे या मंचाचे मत आहे. त्यामुळे वि.प. यांनी तक्रारदार विरुध्द दि.२३-०६-२०१६ च्या नोटीसीद्वारे चालू केलेली कारवाई रद्द केली जाण्यास पात्रआहे.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांचा प्रस्तुत तक्रार अर्ज खालील प्रमाणे मंजूर करणेत येत आहे

२) विरुध्द पक्षकार -वितरण कंपनी यांनी तक्रारदार मे. मेकासॉफ्ट तर्फे भागिदार श्री तुषार सुरेशराव कुलकर्णी प्लॉट क्र.९७ - ९९ , ११४ फेज-१ सेक्टर बी लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट तिळवणी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांचे विरुध्द श्री एल. एस.पी. द्वेद यार्न कंपनी यांची कथित थकबाकी वसूल करणेसाठी सुरु केलेली कारवाई रद्द करण्यात येत आहे. या कारणा वरुन तक्रारदार यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येऊ नये असे वि.प. यांना सुचित करण्यात येत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |